PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 1

# पारधी समाज आणि स्त्री जीवनः एक दृष्टीक्षेप

**प्रा. प्रभाकर काशिनाथ गायकवाड**
सहा. प्राध्यापक,
शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय,लोहारा
ता. लोहारा जि. उस्मानाबाद
**महाराष्ट्र भारत**

**प्रा. डॉ. विनोद विठ्ठलराव जाधव**
सहा. प्राध्यापक,
मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,
औराद शहाजानी, ता. निलंगा जि.लातूर
**महाराष्ट्र भारत**

## 1.प्रस्तावना :

गेल्या अनेक वर्षापासून गावगाडयाशी कसल्याही प्रकारचा संबंध न ठेवता उपजिविकेकरिता स्वतंत्रपणे भटकंती करीत फिरणारे जे भटक्या जाती–जमातींचे समुह महाराष्ट्रात अनेक आहेत. त्यापैकी पारधी हा एक समाज आहे. 1981 सालच्या शिरगणतीनुसार पारध्यांची संख्या महाराष्ट्रात 95,115 इतकी होती. जिल्हयानिहाय मुखत्वेकरुन नाशिक (2,223) धुळे (6,367) अकोला (12,774) बुलढाणा (9,908), उस्मानाबाद व लातूर (5451) सोलापूर (7332) व यवतमाळ (4410) इतकी होती तर 2001च्या शिरगणतीनुसार त्यात वाढ झालेली दिसून येते. राज्यात त्यांची एकुण लोकसंख्या (1,59,875) इतकी झाली व संशोधन क्षेत्र असलेल्या उस्मानाबाद जिल्हयात एकूण लोकसंख्या 15,155 इतकी होती.

महाराष्ट्राच्या सोलापूर, सांगली, कोल्हापूर जिल्हयात तसेच विदर्भात आणि खानदेश विभागात विपुल प्रमाणात आढळणारी ही जात आहे. ‘‘जातीचे नाव पारध करणे शिकार करणे या शब्दावरुन आलेले आहे.’’[1]पारधी याच जातीसाठी शिकारी, बहेलिया, मोहिया, आणि टाकणकार/ टाकणकर हे शब्द तत्सम म्हणून वापरण्यात येतात. वास्तविक रुढ अर्थानी पारधी यांना शिकारी म्हणावे की नाही याबाबत माझा मनात थोडी सांशकच आहे. कारण शिकारी बंदुकीचा वापर करतात. मात्र पारधी करीत नाहीत. पारध्यांच्याच एका कथेनुसार पारध्यांचा पुर्वज गोंड होता. त्याला महादेवाने फासे टाकण्याची कला शिकविली ज्यामुळे तो गोळी मारुन बंदुकीने प्राणी

मारण्याच्या पापापासून वाचू शकेल. तेव्हा पासून ते केवळ फासे, जाळे आणि सापळे लावूनच शिकार करु लागले.

2.**पारध्यांच्या पोटजाती :**

पारधी ही जमात प्रामुख्याने महाराष्ट् व मध्यप्रदेशात वास्तव्य करते. ती विविध भागात वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. महाराष्ट्रात फासेपारधी,मुंबई इलाख्यात टकारी किंवा भामटे, उत्तरभारतात भवरा (बहेलिया किंवा बोरिआ) मध्यभारतात लंगोटी पारधी, कच्छ, खानदेश आणि धारवाड या ठिकाणी कांही मुसलमान पारधीही आढळतात.शिवाय मोहिया ‘‘आंध्रप्रदेशात नहार आणि कर्नाटकात राण पारध्यांना हक्कीपिक्की (Hakki Pikki) म्हणतात. हेच गुजरातमध्ये वाघरी नावाने ओळखले जाता’’[2]

या जमातीच्या उगमाची सखोल व अचूक माहिती अद्यापही उपलब्ध होउ शकली नाही. त्यांची भटकंती जीवन त्यातून कालौधात इतर स्थानिक समाजाशी आलेला संपर्क आणि वास्तव्यामुळे त्यांच्यात झालेला सामाजिक सांस्कृतिक बदल ही त्या–त्या ठिकाणाच्या वस्तीतील वयस्क लोकांच्या स्मरणशक्तीवर आधारित आहेत. शिकार हा देवाने दिलेला व्यवसाय आहे. म्हणून पारधी असा ठाम दावा करतात. ‘‘कांहीजन स्वतःला महाभारतात उल्लेखलेला पारधी महादेवाचे वंशज मानता, ज्यांने जंगली अस्वलाची शिकार करण्यासाठी थेट अर्जुनाला आव्हान दिले होते.’’[3] मात्र याबद्दल कोणत्याही पुराव्याची इतिहासात नोंद नाही. त्यांच्याकडून अनेक आख्यायिका ऐकिवात आहेत. परंतू त्या संबंधी कोणताही पुरावा नाही.

पारधी स्वतःला विंध्य व सातपुडा पर्वतातील रहिवाशी मानतात. ‘‘ते स्वतःला राणा प्रतापाचे वंश म्हणतात’’[4] त्यांना मेवाडे असेही म्हटले जाते. यावरुन ते (राजपुताना) राजस्थान प्रांतातील मेवाडचे असावेत ‘‘राजस्थानात 18जून 1576 च्या हळदीघाटाच्या युध्दात राणा प्रतापाचा पाडाव झाला. तरी त्यांनी संपूर्ण प्रदेशावर अकबराचे स्वाभिमान प्रस्थापित होउ दिले नाही’’.[5] अकबर पकडेल आणि धर्मांत्तर करावे लागेल या भितीपोटी अनेक स्वाभिमानी राजपुतांच्या टोळ्यांनी राजस्थानातुन गुजरातमध्ये पलायन केले. त्यांना तेथील प्रस्थापितांनी आश्रय न दिल्याने ते रानावनात भटकंती करुन आपली उपजीविका करावी लागली. ‘‘ते स्वतःला पराश म्हणवू लागले. (पारश–शिकारी)’’[6] पराश म्हणजे आजचे पारधी ही नवीन ओळख घेतली.संविधान

PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 1

(अनुसुचित-जनजाती) आदेश 1950अन्वये अडवाचिंचर व फासेपारधी धरुन पारधी जमातही अनुसुचित जनजाती म्हणून जाहिर केलेली आहे.

**2.1पारधी समाजाची सद्यःस्थिती :-**

पारधी एक गुन्हेगार जमात म्हणून जी त्यांची ओळख होती ती आज शासकीय पातळी वरुन खोडली गेली असली तरी आजही पारधी जमात लोकांच्या आणि पोलीसांच्या दृष्टीने गुन्हेगार जमातच समजली जाते. सेंटलमेंटमधुन मुक्त झालेल्या पारधी जमातीला स्वतःच्या गावाच्या हद्दीत वास्तव करण्यास गावक-यांचा विरोध असतो. खेडयांमध्ये शेतकाम मिळत नाही. वर्षानुवर्ष गावगाडयाशी कसलाही संबंध नसल्याने व रानावनातील वास्तव्यामुळे आधुनिक दळणवळणाचे साधने तसेच तंत्रज्ञानाच्या माहिती व वापराचा अभाव इत्यादी कारणामुळे पारधी समाज आजही मागासलेला अर्थहीन शासकीय सुविधापासून वंचित व पोलीस प्रशासनाकडून होत असलेल्या अन्याय इत्यादी सामाजिक शाप सोबतीला घेउन आपले अस्तिव टिकवण्याची केविलवाणी धडपड करत आहे.

**3 पारधी जमातीतील स्त्रीजीवन :-**

पारधी ही स्त्रीसत्ताक आदिम जमात असल्याचे दिसते. पारधी पुरुष शिकारीमुळे हिंस्त्र पशुकडून मारला जात असे.तसेच परकीय आक्रमणातही मारला जात असे. चोरी दरोडे यामध्ये खुनखराबा होउन प्रस्थापिताकडून मारला जात असे गावकरी व पोलीस सामुदायिकरित्या पारधी पुरुषांची हत्या करीत असत. त्यामुळे पारधी समाजामध्ये स्त्रियांची संख्या पुरुषांच्या तुलनेत जास्त असते. त्यामुळे आपल्याच जातीतल्या इसमाकडे बाई गहाण ठेवणे, विकणे, भाडयाने देणे या पध्दती या समाजात रुढ झालेल्या आहेत. पारधी स्त्री ही पारधी पुरुषांची संपत्ती समजली जात असे. म्हणून पारधी समाजात मुलगी जन्माला आली तर आनंद साजरा करतात. व मुलगा जन्माला आला तर सर्वजन मिळून रडतात.

3.1 महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे स्त्री-पुरुषनिहाय वर्गीकरण दर्शविणारा तक्ता

| वर्ष | एकुण लोकसंख्येतील मुलांचे प्रमाण | आदिवासी लोकसंख्येतील मुलीचे प्रमाण |
|---|---|---|
| 1961 | 941 | 987 |
| 1971 | 930 | 982 |

| | | |
|---|---|---|
| 1981 | 934 | 983 |
| 1991 | 927 | 972 |
| 2001 | 933 | 977 |

**Source**-1 Govt. of Maharashtra Annual Report 2004 -2005 Ministry of Trible Affar's New Delhi, p -31

2. वर्मा आर.सी आदिवासी जमाती–काल आणि उद्या माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली,2003पृष्ठ क्रमाक.13

वरील 3.1 तक्तावुरुन महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्येचे स्त्री–पुरुष प्रमाणे समजते 1961 मध्ये मुलांचे प्रमाण 941 होते तर त्यांच्या तुलनेत मुलींचे प्रमाण 987 इतके होते, 1971 मध्ये मुलांचे प्रमाण 930 होते तर त्यांच्या तुलनेत मुलीचे प्रमाण 982 इतके होते, 1981 मध्ये मुलांचे प्रमाण 934 होते., तर मुलींचे प्रमाण 983 इतके होते 1991 मध्ये मुलांचे प्रमाण 927 इतके होते., तर मुलींचे प्रमाण 972 इतके होते. व 2001 मध्ये मुलांचे प्रमाण 933 इतके होते तर त्या तुलनेत मुलींचे प्रमाण 977 इतके होते.

थोडक्यात एकुण लोकसंख्येतील मुलांच्या प्रमाणापेक्षा आदिवासी लोकसंख्येतील मुलीचे प्रमाण जास्त आहे. वरील आदिवासी मध्ये पारधी या समाजाचाही समावेश होतो.

**3.2 पारधी समाजातील स्त्रियांचे विशेष अधिकार**

पारधी समाजामध्ये स्त्रीला विशेष अधिकार आहेत. उदा. पारधी स्त्रीने आपले धुतलेले लुगडे वळणीवर वाळण्यास घातले असेल तर त्या वाळत घातलेल्या लुगडया खालून त्या स्त्रीच्या नव–याशिवाय दुसरा कोणताही पुरुष या नियमांचा भंग करुन वाळत टाकलेल्या लुगडयाखालून गेला तर पारधी पंचायतपुढे तो गुन्हेगार ठरतो. व पारधी समाज त्याला मोठी शिक्षा करतो. केलेला दंड किंवा शिक्षा या गुन्हेगाराने भोगली नाही तर त्याला जाती बहिष्कृत केले जाते. एवढेच नव्हेतर पेढीतील एखाद्या पुरुषाने स्त्रीकडे वाईट नजरेने पाहिले किंवा तिचा विनयभंग केला, तिला न रुचेल असे वर्तन केले तर ती स्त्री स्वतःचे मुत्र पुरुषांच्या अंगावर टाकते आणि त्या क्षणापासून तो पुरुष जातीतून बहिष्कृत समजण्यात येतो. "या समाजात बलात्कार अपवादानेही पहावयास मिळत नाही. जर एखाद्याने अशा स्वरुपाचे वर्तन केले तर पंचायत त्याच्या

डोक्याचे केस काढून डोक्याला चुना फासून तव्याच्या पाठीच्या काजळीने त्यांचे तोड काळे करुन त्याला गाढवावर उलटे बसवून तांडयातुन हाकलुन काढते व तो मेला असे समजून तिस–या दिवशी त्यांच्या मर्तिकाचे विधी करुन तो आपल्या तांडयातून नष्ट झाला असे जाती प्रमुख जाहिर करतात. व त्यानंतर त्या व्यक्तीशी कोणत्याही प्रकारचा संबंध कोणताही पारधी ठेवत नाही''[7] पारधी समाजात काही प्रसंगी स्त्रीचा खुप खालचा दर्जा असलेला दिसून येतो. स्त्रीला रांड म्हणून संबोधतात. पारधी जमातीतील पुरुषाला कितीही लग्न करता येते असे असले तरीही पारधी स्त्रीला कुटूंबामध्ये आदराचे व मानाचे स्थान असते. स्त्री पंचप्रमुख होउ शकते. ती टोळीची प्रमुखही असू शकते. गावकरी व पोलीस यांच्यामध्ये मध्यस्थ म्हणून काम पाहू शकते. शेती व कुटूंब या क्षेत्रात स्त्रीची सत्ता चालते.

**3.3 जातपंचायतीत स्त्रीला स्थान :–**

इतर भटक्या विमुक्त समाजापेक्षा पारधी समाजाचे खास वैशिष्ट्ये असे सांगितले. जाते की, या समाजात पुरुषाप्रमाणेच स्त्रीलाही जातपंचायतीत पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले जाते. स्त्री स्वतःची तक्रार दाखल करु शकते.

उदा.''परांडा शेळगावची गंगुबाई शिंदे ही पारधी समाजात अतिशय हुशार वकील म्हणून ओळखली जात असे. जात पंचायतीचा निकाल आपल्या बाजूने लागावा यासाठी वादी–प्रतिवादी मुद्दाम आपले खटले गंगुबाईला चालविण्यासाठी देत असते.''[8]

पारधी समाजातील स्त्रियां फक्त वकीलीच करतात असे नाही तर त्या जातपंचायत प्रमुख ही होत्या. त्यांना न्यायनिवाडा करण्याचा अधिकार पारधी जमातीने दिलेला होता.

''लोढ्याबाई काळे ही महिला या जमातीची न्यायधिश म्हणून काम करीत असे व तिचा पती सदु घोटू काळे हा तिच्या हाताखाली काम करीत असल्याचे सागण्यात आले.''[9] पंचायतीत दाखल होणारे खटले त्यांची पार्श्वभुमी किंवा वादी–प्रतिवादीचे जाब–जबाब घेतेवेळी लोंढ्याबाई आपल्या नव–याची मदत घेत. ती जे सांगेल त्याचप्रमाणे तिचा नवरा काम करत असे.

**3.4 बाळंतपण :–**

''पारधी या समाजातीत बाळंतपण पुरुष करतात असे सांगण्यात आले. बाळंतपणासाठी या समाजातील स्त्रियां दवाखान्यात जात नाहीत. त्या आपल्या राहत्या घरीच किंवा वेळप्रसंगी

उघडयावरच, पारधी स्त्री बाळंत होत नसेल तर पतीने किंवा बापाने पोटावर पाय देण्याची पध्दत आहे.’’[10]

पारधी समाजात बाळंतपण पुरुषच करत असल्यामुळे संबंधित महिलेचा पती उपस्थित असणे बंधनकारक असल्याचे व महिलेला दवाखान्यात न नेण्याची पध्दत यांच्यात दिसून येते. यावरुन यांच्यामध्ये असलेल्या मागासपणाची ओळख होते.

**4. निष्कर्ष :-**

1. या समाजाच्या अभ्यासाअंती असे लक्षात आले की पारध्यांचे सामाजिक जीवन पुर्णपणे प्रगत समाजापेक्षा भिन्न आहे म्हणजे त्यांच्यात आजही म्हणावी तितकी प्रगती झालेली नाही.
2. पारधी समाज हा संबंध महाराष्ट्भर विखुरलेला आहे. आज जवळपास 70 वर्ष भारताला स्वातंत्र मिळून झाले असले तरी त्यांना हक्काचे घर मिळाले नाही त्यामुळे त्यांच्या जीवनातील भटकंती संपलेली नाही.
3. पारधी समाजात अनेक पोटजाती आहेत. या पोटजातीमध्ये बेटी व्यवहार होत नाही.
4. आजही पारधी जमातीकडे पाहण्याचा इतर समाजाचा व पोलीसाचा गुन्हेगार म्हणून जो दृष्टीकोन होता. त्यात कसलाच बदल झालेला नाही.
5. इतर आदिवासी समाजाप्रमाणेच पारधी समाजातही पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे.
6. प्रगत समाजाच्या व इतर आदिवासी यांच्या तुलनेत पारधी समाजामध्ये स्त्रियांना विशेष अधिकार व स्वतंत्र आहे.
7. यांच्यातील ब-याच प्रथा या आघोरी स्वरुपाच्या व इतर समाजापेक्षा भिन्न असलेल्या दिसून येतात.
8. पारधी समाज हा पुरुषप्रधान असलातरी स्त्रीसत्ताक समाजाची बरीच लक्षणे यांच्यात दिसतात.

# संदर्भ सूची :-

1. भारतातील जातीभेद आणि त्यावर उपाय, व्हटकर नामदेव, अजब पुस्तकालय कोल्हापूर, तृतीय आवृती 1972 पृ.क्र. 26
2. Satya. N. Ratha, Geroge Pfeefer, Deepak kumar Behra, Contemporary Society: Tribal Studies, Concept. Publishing company (1997) P.110
3. Dr. Jha Arvind kumar, A study of pardhi's Struggle for survival vis. A. vis. Wild life protection Acts ( An Anthro Ecological study) P.02
4. Sangave Vilas A. Phanse Pardhi of Kolhapur: A Tribe in Transition, Sociological Bulletin ,XVI, (Sept. 1967)P.81
5. मांडे प्रभाकर, उपेक्षित पर्व, परिमल प्रकाशन औरंगाबाद, पृ.क्र.52
6. Singh K.S., People of India Mh. Part III Vol. XXX, P. 1662
7. विमुक्तायन, लक्ष्मण माने पृ.क्र.82
8. भटक्या विमुक्तांची जातपंचायत, रामनाथ नामदेव चव्हाण, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स ,प्रा.लि.पुणे, पहिली आवृती 5 मार्च 2002 पृ.क्र.233
9. कित्ता पृ.क्र.233
10. जाती आणि जमाती, प्रा. रामनाथ चव्हाण नवीन उद्योग, पुणे चौथी आवृती,एप्रिल 2011 पृ.क्र.163